# माजी विद्यार्थी समिती २०१८-१९

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील दि. १८/०८/२०१८ शनिवार रोजी माजी विद्यार्थी कार्यकारीणी सभा उपाध्यक्ष श्री. सुनील बोरसे यांचे अध्यक्षतेखाली वाचन कक्ष येथे संपन्न झाली. सभेला सात कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते. सभेत प्रथम दि. १५/०२/२०१८ रोजी संपन्न झालेल्या माजी विद्यार्थी सभेचे इतिवृत्त समिती संयोजक डॉ. शरद काठोके यांनी वाचून दाखविले ते सर्वानुमते मंजूर करण्यात करण्यात आले. तदनंतर सभेतील दुसरा विषय महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासाबाबत चर्चा झाली. यामध्ये महाविद्यालय प्रशासनाने एम.ए. अर्थशास्त्र, एम.ए. मराठी, आणि एम.कॉम. हे पदव्युत्तर वर्ग सुरु करणेसाठी शासन स्तरावर प्रयत्न करावे असे ठरले. तसेच महाविद्यालय विकासात माजी विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग कसा वाढविता येईल त्याबाबत चर्चा करणेत आली. माजी विद्यार्थ्यांनी शक्य तितकी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मदत महाविद्यालयास करावी असेही आवाहन करण्यात आले. शेवटी अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळी विषय नसल्याने सभा संपन्न झाली.

सदर सभेला महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. डी.एस. पाटील, समिती सदस्य श्रीमती एच.एम. कोटेचा, डॉ. व्ही.पी. चौधरी, डॉ.आर.टी. मोरे तसेच डॉ.एस.एस. काठोके उपस्थित होते.

डॉ.एस.एस. काठोके<br>
संयोजक<br>
माजी विद्यार्थी समिती

माजी विद्यार्थी कार्यकारी सभेला उपस्थित उपप्राचार्य श्री. डी.एस. पाटील सर, श्रीमती एच.एम. कोटेचा, व उपाध्यक्ष श्री. सुनील बोरसे.

